**प्रेसनोट** दि.०३.०१.२०२०

**शिर्षक** :- श्री. राजेंद्र सखाराम थोरवडे, वय ५५ वर्षे, सहाय्यक पोलीस उप निरीक्षक, नेम. तासगांव पोलीस ठाणे यांना २५,०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | पुणे परिक्षेत्र, सांगली युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक | तासगांव पोलीस स्टेशन, गुरनं ०३/२०१९ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८(सुधारीत २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | श्री. राजेंद्र सखाराम थोरवडे, वय ५५ वर्षे, सहाय्यक पोलीस उप निरीक्षक, नेम. तासगांव पोलीस ठाणे वर्ग – ३, रा. अवधुत, हरीपुर रोड, काळीवाट, सांगली, जि. सांगली |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३०,०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २५,०००/- रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे लहान भावाची पत्नीने तक्रारदार व तक्रारदार यांचे घरातील मंडळी यांचे विरुध्द मारहाण करुन शारीरीक छळ केल्याची तक्रार दिल्याने तक्रारदार व तक्रारदार यांचे घरातील मंडळी यांचे विरुध्द तासगांव पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल झाला आहे. सदर गुन्हयाचा तपास तासगांव पोलीस ठाणेचे सपोफौ श्री. राजेंद्र थोरावडे यांचेकडे असुन गेल्या चार दिवसापासुन ते तक्रारदार यांना पोलीस ठाणेमध्ये बोलावुन घेवुन त्यांना बसवुन ठेवतात व तक्रारदार यांना तुम्हा सर्वांना अटक करणार आहे, तुझे भाऊ सरकारी नोकरीमध्ये आहेत मी त्यांची नोकरी घालवणार आहे. जर हे थांबवायचं असेल तर तु मला एक लाख रुपये दे असे म्हणुन लाच मागणी करीत असल्याचे तक्रारदार यांनी दि. २८.१२.२०१९ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो सांगली कार्यालयाकडे तक्रार दिली होती.<br>तक्रारदार यांनी दिले तक्रारीनुसार दि.२८.१२.२०१९ रोजी केले पडताळणीमध्ये श्री. राजेंद्र थोरवडे, सहाय्यक पोलीस उप निरीक्षक, नेम. तासगांव पोलीस ठाणे यांनी तक्रारदार यांचेकडे ७०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन त्याचा पहिला हप्ता म्हणुन ३०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन दि. ३०.१२.२०१९ रोजी रक्कम घेवुन येण्यास सांगीतलेचे निष्पन्न झाले.<br>त्यानंतर दि. ३०.१२.१९ रोजी तासगांव पो.ठाणे येथे सापळा लावला असता श्री. राजेंद्र थोरावडे यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली परंतु सदर वेळी रक्कम घेतली नाही.<br>त्यानंतर आज दि. ०२.०१.२०२० रोजी तासगांव पोलीस ठाणे येथे पुन्हा सापळा लावला असता श्री. राजेंद्र थोरवडे, सहाय्यक पोलीस उप निरीक्षक, नेम. तासगांव पोलीस ठाणे यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करुन तक्रारदार यांचेकडुन २५,०००/- रुपये लाच स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. श्री. राजेंद्र सखाराम थोरवडे, वय ५५ वर्षे, सहाय्यक पोलीस उप निरीक्षक, नेम. तासगांव पोलीस ठाणे यांचे विरुध्द तासगांव पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरित लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.शी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- पोलीस उपअधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, बदाम चौक, सांगली ,४१६४१६
संकेत स्थळ :- acbmaharashtra.gov.in
ई-मेल :- acbwebmail@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार ॲप :- acbmaharashtra.net   टोल फ्री क्रमांक :- १०६४
दुरध्वनी क्रमांक :- ०२३३,२३७३०९५   व्हॉट्सॲप क्रमांक :- ९८२३६१८००१

(प्रशांत चौगुले)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगली.